# परीक्षा विभागाने कसली कंबर

## २२ दिवसांत करणार ६० दिवसांचे काम ; पेपर तपासणीसाठी सॉफ्टवेअरचा शोध

**कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी परीक्षा विभागाने कंबर कसली आहे; मात्र अपुरे मनुष्यबळ, कोरोनाचे संकट आणि पेपर तपासणाऱ्या सॉफ्टवेअरचा शोध, अशी अनेक आव्हाने परीक्षा विभागासमोर आहेत.**

परीक्षा घेताना कोणती काळजी घ्यायची, याच्या मार्गदर्शक सूचना राज्य सरकारकडून आल्या आहेत.

प्रश्नपत्रिका तयार करणे, ऑनलाईनसाठी तांत्रिक बाबींची पूर्तता करणे, वेळापत्रक निश्चिती या कामांना वेग आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर विद्यापीठांना अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे बंधनकारक झाले. विद्या परिषदेच्या बैठकीत ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय झाला. १ ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा तर १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा होणार आहेत; मात्र यासाठी परीक्षा विभागाची चांगलीच तारांबळ उडाली आहे. मुळात परीक्षा विभागात मंजूर ११७ पदांपैकी ४७ पदे रिक्त असल्याने ७० कर्मचारीच कार्यरत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या कर्मचारी उपस्थिती अटीमुळे रोज ३० ते ४० कर्मचारीच उपस्थित असतात. एरवी परीक्षांचा कार्यक्रम ६० दिवसांचा असतो; मात्र आता केवळ २२ दिवसांत याची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

### शासनाच्या मार्गदर्शक सूचना

- विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वाधिक प्राधान्य द्यावे
- परीक्षा घेताना विद्यार्थिहिताचा विचार व्हावा
- तंत्रज्ञानाचा सर्वाधिक विचार व्हावा
- १५ सप्टेंबरला प्रात्यक्षिक
- १ ऑक्टोबरला लेखी परीक्षा



### अतिरिक्त मनुष्यबळ घेणार

कुलसचिव आणि कुलगुरूंकडून परीक्षा विभागाला अतिरिक्त मनुष्यबळ देण्यासंबंधी काम सुरू असून लवकरच त्यांना जादा मनुष्यबळ मिळण्याची चिन्हे आहेत. परीक्षेसाठी लागणाऱ्या प्रश्नपत्रिका बनवण्यासाठी प्राध्यापकांना प्रश्नसंच बनवण्यास सांगण्यात आले आहे. अधिष्ठाता मंडळ आणि अभ्यास मंडळातील सदस्य समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रश्नपत्रिका बनवण्यात येतील. प्रश्नपत्रिका तपासून देणाऱ्या सॉफ्टवेअरचा शोध सुरू असून शासन हे सॉफ्टवेअर घेऊन देण्याची चिन्हे आहेत.

> **परीक्षा ऑनलाईन होणार असल्याने अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात जाऊन आपले मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी यांची नोंद करावी. क्रमांक अथवा ई-मेल बदलले असतील तर त्यांची नव्याने नोंद करणे आवश्यक आहे.**
> **- गजानन पळसे**, परीक्षा संचालक

# अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी सॉफ्टवेअरसंदर्भात चाचपणी

## परीक्षा घेण्याचे नियोजन सुरू; वेळापत्रक लवकर जाहीर होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्ष शेवटचे सत्र आणि बॅकलॉगच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यासाठीचे शिवाजी विद्यापीठाकडून नियोजन सुरू झाले आहे. परीक्षेच्या सॉफ्टवेअर संदर्भात शासन आणि विद्यापीठस्तरावर चाचपणी सुरू झाली आहे. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाकडून जाहीर केले जाणार आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्ष व बॅकलॉगच्या परीक्षांबाबतचा निर्णय विद्यापरिषदेच्या बैठकीत झाला. त्यानुसार विद्यापीठ प्रशासन व परीक्षा विभागाकडून परीक्षा घेण्याचे नियोजन सुरू झाले आहे. अंतिम वर्षाचे शेवट सत्र व बॅकलॉग मिळवून ५८० हून अधिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. यात ४५ हजार विद्यार्थी नियमित ३० हजार बॅकलॉगचे आहेत.

कोरोना व अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने सकारात्मक पाऊल उचलले असून विद्यापीठातील हंगामी शिक्षकांना तीन महिन्यांचा कालावधी वाढवून देण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठ अधिविभागात ऑनलाईन शिकविणे व परीक्षेच्या कामकाजासाठी मदत होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

परीक्षा विभागात सध्या अपुरे कर्मचारी आहेत. त्यापार्श्वभूमीवर कुलसचिवांनी स्वतंत्र आदेश काढून कर्मचारी वाढविले आहेत. ५० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची प्रश्नपत्रिका असणार आहे. अधिष्ठाता व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष 'क्वेशन बँक' तयार करण्यासाठीचे नियोजन करीत आहेत. विषय शिक्षकांनी बहुपर्यायी प्रश्नसंच तयार करण्याचे काम सुरू केले आहे. बॅकलॉगच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी त्या-त्या महाविद्यालयांना देण्यात आली असून त्याचेही नियोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल नंबर, ई-मेल आयडी महाविद्यालयाशी संपर्क साधून अपडेट करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.